## ANNUAL / SPECIAL GENERAL
## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं.      Date / तारीख

| RESOLUTION NO.<br>ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS<br>हजर सभासद व ठराव | REMARKS<br>शेरा |
|---|---|---|
| | संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त | |
| | ओशिवरा रिद्धी सिद्धी स-गृ-स(म)-चे संस्थेच्या पूर्नविकासासेमधाल संस्थेने सिलबंद प्रस्तावाद्वारे मागविण्यात (विकासकाकडून) आलेल्या एकूण प्रस्तावामधून कमित कमि तीन प्रस्तावाची अल्पसूचि तयार करण्यासाठी (निवड करण्यासाठी) संस्थेच्या सभासदाची विशेष सर्वसाधारण सभा आज रविवार दि०२५-१२-२०२२ रोजी दुपारी १२ वाजता वागड विसा ओसवाल समाज सभागृह येथे घेण्यात येत आहे. | |

दिनांक : २७/१२/२०२२

## संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

ओशिवरा रिद्धी सिद्धी स.गृ.सं.(म), आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प), मुंबई - ४००१०२, या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा या सभेचे संस्थेच्या सर्व सभासदांना दिनांक १९/१२/२०२२ रोजी दिलेल्या सूचना पत्रानुसार वागड विषा ओसवाल समाज सभागृह या ठिकाणी दिनांक २५/१२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात आली. या सभेस सर्व सभासद उपस्थित राहिले. सभासदांच्या उपस्थितीनंतर सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यात आली.

सदर सभेसाठी सभा अध्यक्षपदाची निवड करण्याचे ठरले. यासाठी पुनर्विकासाच्या कोणत्याही सभेसाठी संस्थेचे अध्यक्ष हेच सभेची अध्यक्षता भूषवतील या नियमाप्रमाणे सभाध्यक्ष म्हणून श्री. मधुसूदन रुक्माजी भालेकर यांचे नाव श्री. अन्सारी कबीर अहमद यांनी सुचवले व त्यास श्री. पांडूरंग वामन ठाकूर यांनी अनुमोदन दिले म्हणून तसा ठराव घेण्यात आला.

ठराव : **"ओशिवरा रिद्धी सिद्धी स.गृ.सं.(म) च्या आज दिनांक २५/१२/२०२२ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदी श्री. मधुसूदन रुक्माजी भालेकर यांची निवड करण्यात येत आहे".**

सुचक : कबीर अहमद अन्सारी<br>
अनुमोदक : पांडूरंग वामन ठाकूर<br>
ठराव सर्वानुमते मंजूर

सभाध्यक्ष म्हणून श्री. भालेकर यांची सर्वांचे आभार मानून सभाध्यक्षपद स्वीकारले व सभेचे पुढील कामकाज सुरू करण्याचे आदेश दिले.

त्यांचे आदेशाप्रमाणे सचिवांनी सभेचे कामकाज सुरू केले. सचिवांनी आजच्या सभेचा मुख्य विषय सभासदांना विस्तृतपणे सांगितलं व तो असा, आजची सभा संस्थेकडे संस्थेच्या पुनर्विकासासाठी संस्थेने जाहीरातीद्वारे मागविण्यात आलेल्या प्रस्तावाविषयी सभासदांना माहिती देऊन त्यामधून संस्थेच्या व्यवस्थापक समितीला अधिकारांचा वापर करून तुलनात्मक तयार करण्यात आलेली असून त्याबद्दलची सर्व माहिती आपल्याला श्री. मधुसूदन भालेकर हे देतील असे सांगून त्यांनी त्यांना माहिती देण्यास सांगितले.

श्री. भालेकर यांनी सर्वांना अशी माहिती दिली की, संस्थेच्या व्यवस्थापक समितीला संस्थेने दिलेल्या अधिकारांचा वापर करून जे कार्य केलेले आहे त्याविषयीचा कार्य अहवाल बनवून त्याचे वाचन सर्वासमोर करण्यात आले तो असा.

संस्थेवर विकासकाची निवड करण्याकरीता जाहिरातीद्वारे दिनांक २७ ऑगस्ट २०२२ रोजी मराठी, हिंदी व इंग्लिश भाषेच्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन सीलबंद प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. एकूण सहा विकासकाचे प्रस्ताव संस्थेला प्राप्त झालेले होते. हे सर्वच्या सर्व प्रस्ताव संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा घेऊन दिनांक १७/०९/२०२२ रोजी संस्थेच्या प्रकल्प सल्लागार शिल्प असोसिएटचे प्रतिनिधी श्री. धीरज गटकर व विकासकांच्या प्रतिनिधींसमक्ष, विडिओ शुटींगद्वारे व उपस्थित सर्व सभासदांसमोर उघडण्यात आले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१. इन्फिनिटी कन्स्ट्रक्शन
२. सहयोग होम्स लिमिटेड
३. गुरूकृपा रिअलकोन इंफ्राबिल्ड एलएलपी
४. इस्सिरा रिऍलिटी एलएलपी
५. आशक्या होल्डिंग एलएलपी (लोटस ग्रुप ऑफ कंपनी)
६. लक्ष्करीया हौसिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म) नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२ आदर्श नगर, मुंबई-४००१०२

प्रत्येक विकासकाबाबत संस्थेच्या आर्थिक सल्लागारांकडून आलेले अहवाल, कायदेविषयक सल्लागारांकडून आलेल्या अहवाल व संस्थेच्या प्रकल्प (सल्लागाराकडून) मिळालेल्या सल्ल्यांच्या आधारे व व्यवस्थापक समितीला शासनाच्या नियमांर्गत संस्थेने दिलेल्या अधिकारांचा उपयोग करून व्यवस्थापक समितीने वरील सर्व सहा विकासकांकडून देण्यात आलेल्या ऑफर्स लेटर नूसार आढावा घेवून ज्यापैकी खालील ३ विकासकाची अंतिम निवड बाबत पात्रता विचारात घेवून ७९-ए. पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

१. मे. गुरूकृपा रिअलकॉन इंफ्राबिल्ड एलएलपी.
२. इंस्पिरा रिऍलिटी एलएलपी.
३. सहयोग होम्स लिमिटेड.

या तीन विकासकांना पात्र ठरवून व्यवस्थापक समितीने संस्थेच्या विकासकाच्या निवडीसाठी कलम ७९-ए अंतर्गत घ्यावयाच्या सभेसाठी नामनिर्देशित करण्याचे ठरविले आहे.

त्याप्रमाणे या सभेसाठी जी सूचना पाठविण्यात आलेली आहे. त्यांच्यासोबत विकासकाकडून आलेल्या मूळ प्रस्तावाचे आधारे बलवून आलेला तुलनात्मक तक्ता व त्यानंतर सुधारित सीलबंद पद्धतीने मागविण्यात आलेल्या प्रस्तावावरून तयार करण्यात आलेला तुलनात्मक तक्ता असे दोन्ही तक्ते पाठविण्यात आलेले आहेत ते आपण तक्ते सर्वांनी वाचले असतील याबाबत विचारले असता उपस्थित सर्व सभासदांनी वाचून आम्हाला समजल्याने सांगितले. अजून कोणाला काही शंका असेल अथवा काही विचारावयाचे असेल असे विचारून शंकांचे निरसन करून घ्यावे, कारण ज्या विकासकांना व्यवस्थापक समितीने निवडलेले आहे. त्यामधून एका विकासकाची अंतिम निवड संस्थेच्या पुनर्विकास योजनेसाठी करावयाची आहे व ही निवड मा. उपनिबंधक, म्हाडा, मुंबई यांचे कार्यालयाकडून उपस्थित प्रतिनिधीसमोर मतदानाद्वारे व्हिडिओ शुटींगद्वारे समोर करण्यात येणार आहे. त्यामुळे जर याविषयी काही शंका असतील तर निरसन करून घ्याव्यात असे आव्हान करण्यात आले. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून सर्वांनी एकमुखाने होकार दिला म्हणून अध्यक्षांनी सचिवांना असे सांगितले की, यासाठी आजच्या सभेमध्ये ठराव पारित करावा लागेल असे सांगितले व हा ठराव पारित करण्यासाठी ठराव्याच्या बाजूने हात उंच करून सहमती घेण्यात आली व तसा ठराव मांडण्यात आला.

**ठराव** : ठराव करण्यात येतो की, ओशिवरा रिद्धी सिद्धी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ९७६, ओशिवरा रिद्धी सिद्धी, आदर्श नगर, कोड क्रमांक ०३४, लिंक रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई - ४००१०२, दिनांक २५/१२/२०२२ या संस्थेच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-ए मधील तरतूदीनूसार संस्थेस प्राप्त झालेल्या एकूण ६ ऑफर्स लेटर/प्रस्तावानूसार तुलनात्मक तक्त्यात मध्ये नमूद केल्यानूसार अंतिम ३ पात्र ठरलेले विकासक (१) मे. गुरूकृपा रियलकॉन इंफ्राबिल्ड एलएलपी (२) में. इंस्पिरा रिॲलिटी एलएलपी (३) मे. सहयोग होम्स लिमिटेड या ३ विकासका ७९-ए मधून एका विकासकाची अंतिम निवड करण्याकरीता सभेस प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याकरीता मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांना प्रस्ताव दाखल करण्यातबाबत सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासदांनी हात वर करून एकमताने मंजूरी दिली आणि पारित करण्यात आले.

सूचक : श्री. संजीव जग्गी
अनुमोदक : श्री. अल्ताफ गोबित्र
ठराव सर्वानुमते मंजूर

अशा प्रकारे सर्व माहिती देऊन आजच्या सभेच्या कामकाज संपण्यात आले. सभेला उपस्थित राहिल्याबद्दल उपस्थित सभासदांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म.) नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२ आदर्श नगर, मुंबई-४००१०२

सभा अध्यक्ष सचिव

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म.)
अध्यक्ष सचिव

# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं.  Date / तारीख 12/02/2023

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|

संस्थेच्या विकास निवडीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

ओशिवरा रिद्धी सिद्धी स.गृ.स.(म) आदर्श नगर रुम नं ८७५ जोगेश्वरी (प) म्हाडा योजना कोड क्र. ७३१ जोगेश्वरी (प) मुंबई १०२ संदर्भिका क्र. ८२७ ले १०१८ या संस्थेची संस्थेने राबविलेल्या संस्थेच्या पुर्नविकासासाठीच्या प्रक्रियेमधील संस्थेवर विकासक नेमण्यासाठीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अनुसार सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडील दिनांक ४ जुलै २०१९ रोजीच्या सहकारी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीच्या पुर्नविकास बाबत असलेल्या परिपत्रकानुसार विकासक/बिल्डर यांची निवड करण्याकरिता संस्थेने आज रविवार दिनांक १२/२/२३ रोजी सकाळी १० वाजता ठेवून सभागृह रहेजा क्लासिक क्लब इन्फिनिटी मॉलच्या मागे न्यू लिंक रोड अंधेरी (प) मुंबई-४०००५३ येथे संस्थेच्या सर्व सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा संस्थेच्या सर्व सभासदांना दि. २५.०१.२०२३ रोजी दिलेल्या सभेच्या सूचनापत्रानुसार घेण्यात येत आहे.

सदर सभेस मा. उपनिबंधक कार्यालय म्हाडा यांचेकडून सभेचे निरिक्षक म्हणून श्री विठ्ठल सरवदे सहकारी अधिकारी म्हणून उपस्थित असून त्यांचे बरोबरच संस्थेच्या प्रकल्प सल्लागार म्हणून मे शिल्प असोसिएटकडून श्री चिराग गडकर हे उपस्थित आहेत. तसेच पवन बाफिना हे सुद्धा उपस्थित आहेत

दिनांक : १२/०२/२०२३

## -: विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :-

ओशिवरा रिध्दी सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,९७६, ओशिवरा रिध्दी सिध्दी, आदर्श नगर, कोड क्रमांक ०३४, लिंक रोड, जोगेश्वरी (पश्चिम),मुंबई-४०० १०२ या संस्थेच्या पुनर्विकाससाठी सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,महाराष्ट्र राज्य यांच्याकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-अे नूसार दिनांक ४ जुलै,२०१९ रोजीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत असलेल्या परिपत्रकातील तरतूदीनूसार दिनांक १२/०२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता क्लासिक क्लब, इन्फीनिटी मॉलच्या मागे, लिंक रोड, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम),मुंबई-४०० ०५३ येथे संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आलेली होती. सभेकरीता संस्थेचे अध्यक्ष श्री.मधुसूधन रुकमाजी भालेकर, सचिव श्री.अन्सारी कबीर अहमद, खजिनदार श्री.सुर्वे रमेश गणपत, समिती सदस्य श्री.तरुण छाबरा, श्री.बद्रुद्दीन शेख, श्रीमती सुमन विजय सिंग, श्री.पांडुरंग ठाकूर, श्रीमती मंजू पिरवानी, श्री.लिलाधर घनश्याम पाटील, श्री.विजय विश्राम यादव उपस्थित राहिलेत. सभेच्या इतिवृत्त नोंदवहीवर प्रथम उपस्थित सभासदांची स्वाक्षरी घेण्यात आली. संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या वेळी एकूण ९८ सभासदांमधून ७४ सभासद सभेसाठी उपस्थित राहिलेत.

सभेकरीता मा.उपनिबंधक,सहकारी संस्था,पश्चिम उपनगरे,म्हाडा,मुंबई यांचे कार्यालयाकडून जा.क्र.३७८, दिनांक २५/०१/२०२३ रोजीच्या पत्राने प्राधिकृत अधिकारी श्री.विठठल सरवदे,सहकारी अधिकारी,श्रेणी-१ यांची निवड करण्यात आल्याने संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेत प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री.विठठल सरवदे,सहकारी अधिकारी उपस्थित राहिलेत. तसेच प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (पी.एम.सी.) मे.शिल्प असोसिएटस यांचे वतीने प्रतिनिधी श्री.धिरज गडकर उपस्थित राहिलेत. सभासदांच्या उपस्थितीनंतर सभेच्या कामाला विषयसूचीनूसार सुरुवात करण्यात आली.

**सभेचा विषय क्र.१ :-** सभेच्या कामकाजाकरीता सभेच्या अध्यक्षाची निवड करणे.

सभेचे अध्यक्ष म्हणून श्री.मधुसूधन रुकमाजी भालेकर यांचे नांव सभा अध्यक्ष म्हणून जाहिर करण्यात आले. सभा अध्यक्षाच्या नांवास सूचक श्री.अन्सारी कबीर अहमद व अनुमोदक श्री.सुर्वे रमेश गणपत असून सभा अध्यक्षांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

सभा अध्यक्षाची निवड झाल्यांनतर सभा अध्यक्ष श्री.भालेकर यांनी सभेस उपस्थित सभासदांचे आभार व्यक्त करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येत असल्याचे जाहिर केले.

**सभेचा विषय क्र.२ :-** संस्थेने पुनर्विकास बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अे अन्वये केलेल्या कामकाजाबाबत सभेत माहिती देणे.

प्रकल्प व्यवस्थापक सल्लगार (पी.एम.सी.) मे.शिल्प असोसिएटस चे प्रतिनिधी श्री.धिरज गडकर उपस्थित राहिलेत. मे.शिल्प असोसिएटस चे प्रतिनिधी श्री.धिरज गडकर यांनी सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,महाराष्ट्र राज्य यांच्याकडील दिनांक ४ जुलै,२०१९ रोजीच्या सहकारी गृहनिर्माण

नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२

संस्थांच्या इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत काढण्यात आलेल्या परिपत्रकानूसार संस्थेस प्राप्त झालेले ऑफर्स व सुधारीत ऑफर्स नूसार तुलनात्मक तक्ता तयार करुन विकासकाची नांवे सभेत वाचून दाखविण्यात आली. १) मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी २) मे.इस्पिरा रिॲलिटी एलएलपी ३) मे.सहयोग होम्स लिमिटेड ४) मे.इन्फिनिटी कन्स्ट्रक्शन ५) मे.लोटस ग्रुप ऑफ कंपनी (मे.अंशक्या होल्डिंग्स एलएलपी) ६) मे.लष्करीया हौसींग अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या प्रमाणे एकूण ६ ऑफर्स मधून ५ सुधारीत ऑफर्स डाक्युमेंटस संस्थेस प्राप्त झालेले होते. त्यामुळे संस्थेस प्राप्त झालेल्या ऑफर्स व सुधारीत ऑफर्स प्रमाणे विकासक यांची निवड होण्याकरीता तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सुधारीत ऑफर्स विकासक मे.लष्करीया हौसींग अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी दिलेले नसल्याने त्यांचेकडून प्राप्त झालेल्या ऑफर्स प्रमाणे तुलनात्मक तकत्यात नावाचा समावेश करण्यात आला. पात्र विकासक/बिल्डर यांच्या तुलनात्मक तक्त्यामध्ये १) मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी २) मे.इस्पिरा रिॲलिटी एलएलपी ३) मे.सहयोग होम्स लिमिटेड या ३ विकासक/बिल्डर यांनी संस्थेस दिलेल्या ऑफर्स प्रमाणे चटईक्षेत्र, कॉर्पस फंड, भाडे, शिफटींग चार्जेस, बांधकाम कालावधी, बँक गॅरटी व इतर सुविधा याप्रमाणे अनुक्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

संस्थेचे पदाधिकारी व इतर काही सभासद यांनी सभासदांच्या माहितीसाठी व पुनर्विकास योजनेत पारदर्शकता रहावी या करीता अंतिम ३ ऑफर्स व सुधारीत ऑफर्स लेटर मधील विकासक यांचे इतर इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या वेगवेगळया ठिकाणी व वेगवेगळया दिवशी भेट देवून विकासक यांच्याकडून सुरु असलेल्या प्रकल्पाची माहिती घेतलेली आहे असे सभेत सांगण्यात आले. संस्थेच्या पुनर्विकास बाबत कामकाजाची माहिती होण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांचेकडून तयार करण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यानूसार उपस्थित सभासदांना विकासक यांचेकडून मिळणाऱ्या ऑफर्स बाबतची माहिती सभेत देण्यात आली.

**सभेचा विषय क्र.३ :-** व्यवस्थापक समितीने अंतिम तीन विकासक पात्र ठरविले. दि.२५/१२/२०२२ रोंजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सादर करुन एक मताने ठरविले तीन विकासकापैकी एक विकासकाची प्राधिकृत अधिकारी सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-अे अन्वये अंतर्गत निवड करणे.

संस्थेच्या व्यवस्थापक समितीने दिनांक २५/१२/२०२२ रोजी विशेष सभा आयेजित करुन त्यामध्ये तुलनात्मक तक्यातील ३ विकासक यांची नांवे निवड करण्याकरीता निश्चित करण्यात येत असल्याची माहिती सभासदांना दिलेली होती. त्यामुळे अंतिम पात्रता यादीतील ३ विकासक यांचेकडून पुर्नविकास बाबत देण्यात आलेल्या ऑफर्स व सुधारीत ऑफर्स नूसार तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यामधील १) मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी २) मे.इस्पिरा रिॲलिटी एलएलपी ३) मे.सहयोग होम्स लिमिटेड या ३ विकासक/बिल्डर यांनी दिलेले ऑफर्स व सुधारीत ऑफर्स नूसार विकासकाचा बांधकामाचा अनुभव व आर्थिक क्षमता विचारात घेवून संस्थेच्या पुर्नविकाससाठी नियुक्त करण्याचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे प्राधान्य दिलेल्या १) मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी २) मे.इस्पिरा रिॲलिटी एलएलपी ३) मे.सहयोग होम्स लिमिटेड या ३

नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२

विकासक/बिल्डर मधून एक विकासक/बिल्डर यांची निवड करणे आवश्यक असल्याने आजच्या सभेत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-अे व दिनांक ४ जुलै,२०१९ रोजीच्या सहकारी संस्थेच्या पुनर्विकास बाबत असलेल्या परिपत्रकानूसार निवड करण्याबाबत संस्थेच्या वतीने सभेत उपस्थित सभासदांना विनंती करण्यात आली. सभेत प्रथम १) मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी यांचे नांव संस्थेच्या पुनर्विकास करीता विकासक म्हणून निवड करण्याकरीता वाचून दाखविण्यात आले. त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्व **७४** सभासदांनी **मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी** यांची संस्थेच्या पुनर्विकाससाठी निवड करण्याकरीता हांत उंच करुन मतदान केले. त्यांनतर २) मे.इस्पिरा रिॲलिटी एलएलपी यांचे नांव सभेत विकासक म्हणून मतदान करण्याकरीता वाचून दाखविण्यात आले परंतु कोणीही सभासदांनी हात उंच करुन मतदान केलेले नाही. त्यांनतर ३) मे.सहयोग होम्स लिमिटेड यांचे नांव सभेत विकासक म्हणून मतदान करण्याकरीता वाचून दाखविण्यात आले परंतु कोणीही सभासदांनी हात उंच करुन मतदान केलेले नाही. त्यामुळे सभेकरीता उपस्थित प्राधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत संस्थेच्या पुनर्विकास योजनेकरीता विकासक म्हणून सभेला उपस्थित असलेल्या सर्व **७४** सभासदांनी **विकासक मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी** यांची निवड सर्वानुमते केलेली आहे. विकासक यांची निवड आजच्या सभेत सर्वानुमते झाल्याचे संस्थेकडून जाहिर करण्यात आले. तसेच उपस्थित असलेल्या सर्व ७४ सभासदांनी विकासक निवड केल्याबाबत त्यांचे वैयक्तीक सहमती पत्र स्वत: भरुन सभेत स्वाक्षरी करुन प्राधिकृत अधिकारी यांचे समोर संस्थेकडे सादर केलेत. सभेत विकासक यांची निवड केल्याबाबत खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ठराव** :- ठराव करण्यात येतो की, मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी यांचे नांव संस्थेच्या पुनर्विकास करीता विकासक म्हणून निवड करण्याकरीता वाचून दाखविण्यात आले. त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्व ७४ सभासदांनी **मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी** यांची संस्थेच्या पुनर्विकाससाठी निवड करण्याकरीता हांत उंच करुन मतदान केले आहे. तसेच उपस्थित असलेल्या सर्व ७४ सभासदांनी विकासक निवड केल्याबाबत त्यांचे वैयक्तीक सहमती पत्र स्वत: स्वाक्षरी करुन संस्थेकडे सादर केले आहे. सबब सभेस उपस्थित असलेल्या सर्व ७४ सभासदांनी संस्थेच्या पुनर्विकास करीता विकासक म्हणून मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी यांची निवड एकमताने करण्यात आल्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

सूचक : श्री.किशोर मस्तेकर

अनुमोदन : श्री.शाजिद अमिरहमजा मोमीन

ठराव सर्वानुमते मंजूर....

**सभेचा विषय क्र.४ :-** संस्थेच्या पुनर्विकासाकरीता निवड केलेले विकासक/बिल्डर यांची निवड झाल्याची नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी यांचे मार्फत घोषित करणे.

मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी यांची संस्थेच्या पुनर्विकास करीता विकासक म्हणून निवड सभेला उपस्थित असलेल्या सर्व ७४ सभासदांनी हांत उंच करुन मतदान करुन निवड केलेली

नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२

आहे. तसेच उपस्थित असलेल्या सर्व ७४ सभासदांनी विकासक निवड केल्याबाबत त्यांचे वैयक्तीक सहमती पत्र स्वत: स्वाक्षरी करुन प्राधिकृत अधिकारी श्री.विठठल सरवदे,सहकारी अधिकारी,श्रेणी-१ यांचे समोर भरुन संस्थेकडे सादर केलेले आहे. सबब सभेस उपस्थित असलेल्या सर्व ७५ सभासदांनी संस्थेच्या पुर्नविकास करीता विकासक म्हणून **मे.गुरुकृपा रियलकॉन इन्फ्राबिल्ड एलएलपी** यांची निवड करण्यात आल्याबाबत प्राधिकृत अधिकारी यांनी सभेत जाहिर केले व उपस्थित सभासदांचे सभेच्या कामकाजात सहकार्य केल्याबाबत आभार व्यक्त केले.

सभा अध्यक्ष यांनी उपस्थित सर्व सभासदांचे संस्थेच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबाबत व सर्वानुमते विकासक यांची निवड केल्याबाबत सर्वाचे आभार व्यक्त करुन सभा संपल्याचे रितसर जाहिर करण्यात आले.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : १२/०२/२०२३

**सभा अध्यक्ष**

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म.)

अध्यक्ष

सचिव

ओशिवरा रिध्दी सिध्दी स.गृ.सं.(म.) नोंदणी क्र. मु./म्हाडा/गृ/(टी.सी.)/१३०६६/२०११-१२ आदर्श नगर, मुंबई-४००१०२